ISSN: 0973-9483

# 1st International Conference On Universal Human Values

Organized By The
Bahá'í Academy
(A Recognized Institution of Shivaji University),
In Association With the
Dept. Of Education, Shivaji University,
And
International Institute of Organizational Psychological Medicine
(IIOPM), Australia

Panchgani, 11-12 June 2016

THE COMPASS
(Special Issue)
Vol. 10 , No. 1 , November 2016

## SOUVENIR

- [ ] Part 1- Conference Report
- [x] Part 2- Papers Presented
- [ ] Part 3- Papers Presented (Continuation)

217

## Table of Contents


| Paper Title | Page |
|---|---|
| **A Comparative Analysis of Approach to Enhance Life Skills among the Students and Teachers in Rural and Urban Areas**<br>Mr. Amit Deokule | 1 |
| **A Study of Attitudes of Primary Teachers in the Context of Need, Obstacles and Activities of the Universal Human Values**<br>Dr. Dnyaneshwar J Bhamare | 6 |
| **A Study of The Effect of Value Education on Performance of In-Service Trainee Teachers**<br>Dr. Pratibha S. Desai | 12 |
| **Efforts taken by Secondary School Teachers in Developing Universal Human Values Among Students**<br>Dr. Sanjay J. Nimbalkar and Mrs. Manisha D. Patil | 17 |
| **Significance of Human Values in Legal Profession with Special Reference to Kolhapur City**<br>Prof. Dr. Vivek Y. Dhupdale | 23 |
| **A Study of the Impact of Technology Enabled Personalized Learning on Social Progress**<br>Mr. Uday Panchpor, Mrs. Asavari Ambekar and Prof. Ram Takwale | 29 |
| **सकारात्मक दृष्टिकोनाच्या परिपोषातून जीवनात यश, आनंद आणि शांती**<br>डॉ. शारदा विजय निवाते | 36 |
| **शिक्षक प्रशिक्षकांच्या मूल्याधिष्ठीत दैनंदिन परिपाठासाठी निर्मितीक्षम उपक्रमांच्या परिणामकारकतेचा अभ्यास**<br>श्री. रणजित हणमंतराव देसाई | 43 |
| **अक्कलकुवा शहरातील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्य रुजविण्यासाठी मानवी मूल्यांची आवश्यकता: एक अभ्यास**<br>डॉ.कविता साळुंके, ज्योती रामचंद्र लष्करी आणि अनुराधा नामदेव भोसले | 48 |
| **भारतीय राज्यघटनेच्या अंतर्गत येणाऱ्या वैश्विक मानवी मूल्यांच्या रुजवणूकीच्या कृतिकार्यक्रमाची परिणामकारकता: एक अभ्यास**<br>सुश्री. कल्पना शिवाजी साळुंखे आणि डॉ.सुरेश पाटील | 52 |
| **सर्व समावेशक शिक्षणात विशेष गरजा असणाऱ्या बालकांमध्ये मानवी मूल्य रुजविण्यात शिक्षकाची भूमिका: एक अभ्यास**<br>सुश्री. विद्यादेवी भिला बागुल | 57 |
| **सामाजिक मानवी मूल्ये रुजवण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान: एक अभ्यास**<br>सुश्री. अनिता भास्कर थोरात आणि डॉ.सज्जन थूल | 57 |
| **Attitudes of the Teachers Towards Human Values**<br>Mr. Umakant Vasantrao Deshmukh | 66 |
| **Articulation of Ethical Human Values of the Environmentalism by the Indian Judiciary**<br>Dr. M. C. Sheikh | 70 |
| **मुक्त विद्यापीठाच्या एम.एड. विद्यार्थ्यांमध्ये संपर्कसत्राच्या माध्यमातून विविधतेतून एकता, संघटीतपणा, प्रामाणिकपणा, सौंदर्यदृष्टी आणि दूरदृष्टीचा विकास**<br>डॉ.संजीवनी राजेश महाले | 76 |

# अक्कलकुवा शहरातील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्य रुजविण्यासाठी मानवी मूल्यांची आवश्यकता: एक अभ्यास

**लेखिका: डॉ.कविता साळुंके[१], ज्योती रामचंद्र लष्करी[२] आणि अनुराधा नामदेव भोसले[३]**

[१] सहयोगी प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक,
मो.: ७०२८३८०९१३, इमेल: kavita_salunke@hotmail.com

[२] पीएच.डी. संशोधक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
मो.:९५४५९११६७१, इमेल: ph.djyotilashkari@gmail.com

[३] पीएच.डी. संशोधक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
मो.: ८२७५३३५२२५, इमेल: yashcom26210064@gmail.com

## सारांश

आज शिक्षणाची वाटचाल विकासाच्या दिशेने सुरु आहे. शिक्षण क्षेत्रात नवनवीन विचारप्रवाह आल्यामुळे शिक्षण पध्दतीत वारंवार बदल होत आहे. जीवन आणि शिक्षण यांचा खूपच जवळचा संबंध आहे, असे आपण म्हणतो पण व्यक्ती शिक्षण पूर्ण होईपर्यंत प्रत्यक्ष जीवनापासून दूर असतो. म्हणजेच जीवन आणि शिक्षण यांच्यात ताळमेळ घातला जात नाही. परिणामी परावलंबन, बेरोजगारी, जीवनविषयक अनास्था, आत्महत्या इ. असे अनेक प्रश्न आज ही आपल्या डोळयासमोर आहेत. जेव्हा आपण 'शिक्षण हेच जीवन, जीवन हेच शिक्षण हे मान्य करु तेव्हाच शिक्षणातून बालकाचा सर्वांगीण विकास होईल.

असे म्हटले जाते. सर्वांगीण विकासासाठी व्यतीत बाल्यावस्थेपासून नितीमूल्य, मूल्यशिक्षण, जीवन शिक्षण रुजवणे गरजेचे आहे. याचा अर्थ असा, जीवन कौशल्ये शिक्षण देण्यासाठी बालकांमध्ये मूल्याचा विकास व्यवस्थित झालेला नसेल तर कदाचित तो जीवनात यशस्वी होणार नाही. 'मूल्यशिक्षण व जीवनकौशल्य शिक्षण' हे एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. जीवन जगण्याची रीत जरी आपल्याला माहित असली तरी, दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी मानव जी नैतिक कृती करतो त्या नैतिक कृतीवरच त्या मानवामध्ये/व्यक्तिमध्ये किती मूल्ये रूजली आहे हे ठरते व या योग्य नैतिकतेचा आचरणाने व्यक्तिची जीवनशैली ठरते. मूल्यांची रुजवणूक खऱ्या अर्थाने बालकाचा कुटुंबातूनच होत असते. नंतर त्याला शाळा, शिक्षण, परिसर जबाबदार असतात. आजे शालेय पाठ्यक्रमातून जीवन कौशल्य शिक्षण देण्याची वेळ आली आहे. मात्र हे जीवन जगण्याचे कौशल्य देण्याआधी त्या बालकांमध्ये किती प्रमाणात मूल्य रुजली आहे ते पाहणे आवश्यक आहे. कारण योग्य संस्कार झाल्याशिवाय व्यक्तीी योग्य निर्णय घेऊ शकत नाही, भावनांचे समायोजन करु शकत नाही, सहानुभूती नसल्यामुळे सहसंवेदनांची जाणीव त्याला असणार नाही, स्वत:ची क्षमता, बलस्थाने जो पर्यंत त्याला माहित होत नाही तो पर्यत तो क्षमप्रतिष्ठेला लायक ठरु शकत नाही. जर मूल्यांचा अभाव असेल तर बालकाला एक यशस्वी जीवन जगता येणार नाही असे संशोधिकेला वाटते.

वरील विषयी संशोधिकेने सावित्रीबाई माध्यमिक विद्यालय (अक्कलकूवा) येथील इयत्ता ८ वी तील ४० विद्यार्थ्यांवर सर्वेक्षण पध्दतीने माहिती गोळा केली आहे आणि या संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष मुख्य शोधनिबंधामध्ये देण्यात आलेले आहेत.

**बीजसंज्ञा:** जीवन कौशल्य, मानवी मूल्य

## प्रस्तावना

मानवी मूल्य व जीवन कौशल्य शिक्षण हे एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. यशस्वी जीवन जगण्यासाठी लागणारी कौशल्ये मानवाजवळच असतात. मात्र ती फ क्त ओळखता आली पाहिजे. मुळात जीवन म्हणजे काय? हे ही समजून घेतले पाहिजे, मनुष्य जन्माला आला, मरे जर्यंत जगला हे जीवन नव्हे. जीवन जगत असतांना दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी मानव धडपड करतो याला सुध्दा जीवन म्हणता येणार नाही. तर मानवाने आपली दैनंदिन गरजपूर्ण करण्यासाठी कोणत्या प्रकारची नैतिक कृती करुन ती गरज पूर्ण केली हे महत्वाचे आहे. योग्य अशी कृती करण्यासाठी मानवावर मूल्यांचे संस्कार होणेही तितकेच आवश्यक आहे. मूल्य म्हणजे काय? मूल्य म्हणजे ज्याला आपण चांगले समजतो असे काहीतरी. उदा. प्रेम, दयाळूपणा, समाधान, गंमत, प्रामाणिकपणा, सभ्यता, आराम व साधेपणा.

या सर्व गोष्टींचा समावेश यात करण्यात येत असला तर जीवनातील अन्न, वस्त्र, निवारा मिळविण्यासाठी वरील मूल्य अंगी असणे आवश्यक आहे.जीवन कौशल्य शिक्षण रुजविण्याआधी बालकांमध्ये योग्य मूल्यांची रुजवणूक झाली आहे किंवा नाही. जर मूल्यांची रुजवणूक झालेली नसेल तर जीवन कौशल्याचे शिक्षण देऊन काही एक उपयोग होणार नाही. म्हणूनच मूल्यांची रुजवणूक होणे ही तितकेच महत्वाचे आहे.

## उद्दिष्टे

१. जीवन कौशल्य शिक्षण शिक्षणासाठी मूल्य रुजवणूकीच्या आवश्यकतेचा अभ्यास
२. शैक्षणिक प्रणालीतून विद्यार्थ्यांमधील मूल्य रुजवणूकीचा अभ्यास



49